# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यात जिल्हा परिषद पंचायत समिती यांच्या मार्फत मृद संधारण व पाणलोट क्षेत्र विकासाअंतर्गत विविध उपक्रम राबविले जात असल्याबाबत

**(१) ७२६३ (०७-०४-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यापूर्वी जिल्हा परिषद पंचायत समिती यांच्या मार्फत मृदुसंधारण व पाणलोट क्षेत्र विकासाअंतर्गत विविध उपक्रम राबविले जात असून परंतु संयुक्त शेती सहकारी सोसायटीस यापूर्वी या योजनांचा लाभ दिला जात होता त्यामुळे लहान व गरीब आदिवासी शेतकऱ्यांना रोजगार उपलब्ध होत होता परंतु काही वर्षापासून संयुक्त शेती सोसायटीस या योजनेचा लाभ घेता येत नसल्याने लहान व आदिवासी शेतकऱ्यांमध्ये शासनाविरोधात संतापाचे वातावरण निर्माण झाले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले तद्नुसार संयुक्त शेती सहकारी सोसायटींना मृद व जलसंधारण पाणलोट विकास क्षेत्रांतर्गत सुरु असलेल्या योजनांचा लाभ मिळणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेमार्फत मृद संधारण व पाणलोट क्षेत्र विकासांतर्गत अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम (DPAP), एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम (IWDP) व हरियाली या योजना राबविल्या जात होत्या. तथापि सदर योजना जून, २०१३ मध्ये केंद्र शासनाने बंद केल्या असून या योजनांमधून संयुक्त शेती सहकारी सोसायटीस लाभ देण्यात आलेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पावसामुळे पडलेल्या घरांसाठी नुकसानभरपाई देण्याच्या शासनाच्या धोरणाबाबत

**(२) २१४९६ (०६-०८-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्यादिवशी ६५ मि.मि. पावसाची नोंद झाली, त्याचदिवशी झालेल्या पावसामुळे पडलेल्या घरांसाठी नुकसानभरपाई देण्याचे शासनाचे धोरण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्हयातील ग्रामिण भागातील बहुतांश घरे ही मातीची बनलेली असून ही घरे पावसाने भिजून पाऊस पडल्यानंतर ८ ते १० दिवसानंतर पडतात, अशा पडलेल्या घरांना नुकसानभरपाई देण्याचे शासनाचे निकष नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा घरांना नुकसानभरपाई देण्यासाठी पाऊस पडल्यानंतर ८ ते १० दिवसांनी पंचनामा करुन त्यांना नुकसानभरपाई देण्याचे निकष ठरविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०७-२०१६) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) ज्या दिवशी ६५ मि.मी. पाऊस पडतो त्याच करीता NDRF/SDRF च्या निकषानुसार मदत अनुज्ञेय आहे. त्यानंतरच्या कालावधीत घरे पडल्यास मदत अनुज्ञेय नाही.

---

### रायगड जिल्हयात चक्रीवादळासह झालेल्या पावसाने विद्युत पोल तारांसह झाडाची पडझड होऊन झालेले नुकसान

**(३) २२४८९ (१७-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील महाड तालुक्यासह बिरवाडी, एमआयडीसी तसेच महाड शहराला माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या चक्रीवादळासह पावसाने विद्युत पोल तारांसह झाडाची पडझड होऊन शहरातील काकरतळे येथील दाते कुटुंबियांच्या घरांवर वीज कोसळल्याने चार घरांचे आणि बेकरीच्या भट्टीचे आतोनात नुकसान झाले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चक्रीवादळामुळे शहरातील काही काळ वीज पुरवठादेखील खंडित झाला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चक्रीवादळात नुकसान झालेल्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०७-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवलापार (जि.नागपूर) येथून झिंझेरिया जवळ असलेल्या कोल्हापूर बंधाऱ्याची खोलीकरणाच्या कामामध्ये टाकण्यात आलेली रेती ठेकेदार नेत असल्याबाबत**

**(४) २२८२५ (१४-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवलापार येथून (जि.नागपूर) ४ किमी वर असलेल्या झिंझेरिया जवळ जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत नाल्यावर असलेला कोल्हापूर बंधाऱ्याची खोलीकरणाच्या कामामध्ये माती ऐवजी रेती निघत असल्याने सदरची रेती बाजूला टाकण्यात येत असून ती रेती राजरोसपणे ठेकेदार ट्रक्टरवरुन नेत असल्याचे माहे, एप्रिल-मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी किती जणांना अटक करण्यात आली वा त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

रामटेक तालुक्यातील झिंझेरीया येथे कृषि विभागामार्फत नाला खोलीकरणाची कामे करण्यात आलेली असून नाल्याचे खोलीकरण करते वेळी नाल्यातून गाळ, माती, दगड व अल्प प्रमाणात रेती इ.नाल्याच्या काठावर १ ते २ मिटरचे अंतर सोडून टाकण्यात आलेला आहे. नाल्यातील सुपिक गाळ काम सुरु असताना काही शेतकऱ्यांनी आपल्या शेतात स्वखर्चाने नेलेला असून तो नेऊ देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे सदर शेतकऱ्यांकडून कोणत्याही प्रकारचा मोबदला घेण्यात आलेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यासाठी स्वतंत्र प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करणेबाबत**

**(५) २७३३८ (१२-०८-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यासाठी स्वतंत्र प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करणेबाबतची मागणी दिनांक २ जानेवारी, २०१५ रोजीच्या निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत सदर मागणीबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०७-२०१६) :**(१) होय.

(२) नवीन प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करण्यासाठी मानके निश्चित करण्यासाठी परिवहन आयुक्तालय स्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे.

दरम्यान नवनिर्मित पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, वाडा व विक्रमगड या तालुक्यांचा समावेश प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांचे कार्यक्षेत्रातून वगळून उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई कार्यक्षेत्रात करण्यास तसेच मिरा-भाईंदर मनपा क्षेत्राचा समावेश उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई यांचे कार्यक्षेत्रातून वगळून प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे कार्यक्षेत्रात करण्यास दिनांक १२.०१.२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वीर बाजी प्रकल्पाच्या (ता.दौंड, जि.पुणे) लाभ क्षेत्रातील जमिनी दुसऱ्या प्रकल्पासाठी वाटप न करणेबाबत**

**(६) २८३७७ (२३-१२-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीर बाजी प्रकल्पातील (ता.दौंड, जि.पुणे) संपादित जमिनी भूसंपादनाचा भाग म्हणून गृहीत धरून इतर प्रकल्पग्रस्तांना वाटण्याचे प्रयत्न स्थानिक प्रशासनाकडून होत असल्याने एका प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील जमिनी दुसऱ्या प्रकल्पासाठी वाटप न केल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. महसूल मंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०१५ वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०७-२०१६) :**(१) होय.

(२) खडकवासला प्रकल्पामध्ये विरबाजी पासलकर, पानशेत, वीर व नाझरे या प्रकल्पांचे एकत्रित लाभक्षेत्र आहे. त्यासाठी हवेली व दौंड तालुक्यातील ४७ गावांतील सुमारे ३८३६ हे. ७८ आर क्षेत्र संपादित करण्यात आले आहे. तसेच दिनांक ३.३.२०१६ च्या शासन पत्रान्वये विभागीय आयुक्त, पुणे यांना एका प्रकल्पातील लाभक्षेत्रातील जमिनी दुसऱ्या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात येऊ नयेत, असे कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माळमाथा, निजामपूर (ता.साक्री, जि.धुळे) परिसरात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे डाळींब, कांदा या नगदी पिकांचे झालेले नुकसान**

**(७) २९३६१ (१६-०१-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळमाथा, निजामपूर (ता.साक्री, जि.धुळे) येथील परिसरात माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे डाळींब, कांदा या नगदी पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतक-यांच्या नुकसानीची पाहणी करुन त्वरीत पंचनामे करुन शेतक-यांना अर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्याप नुकसानग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन शेतक-यांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०७-२०१६) :**(१) होय.
(२), (३) व (४) धुळे जिल्ह्यात माहे एप्रिल, २०१५ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले असून, त्यानुसार जिल्ह्यात एकूण ५६८७ शेतकऱ्यांचे ३३ टक्केवारी ३३३७.११ हेक्टर क्षेत्रावरील शेती/फळपिकांचे नुकसान झाले आहे. त्यात धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात नुकसान झालेल्या २३३३ शेतकऱ्यांच्या १२४७.५६ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. सदर नुकसानीसाठी मदत देण्याची बाब विचाराधीन आहे.

---

**खतगाव (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील शेतकऱ्याला नुकसान भरपाई तातडीने देण्याबाबत**

**(८) ३२२६० (१६-०१-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन १९८३ च्या अतिवृष्टीमुळे श्री.दादाराव विठ्ठलराव वर्णे, रा.खतगाव (ता.बिलोली, जि.नांदेड) यांच्या शेतातून मन्याड नदीचे पात्र जाऊन त्यांच्या शेतीचे अतोनात नुकसान झाल्याने त्यांना नुकसान भरपाई देण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मंत्रालयात कागदपत्र देऊन सुध्दा अद्याप नुकसान भरपाई न मिळाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ जून, २०१५ रोजी मा.महसूल मंत्री व दिनांक ३ जुलै, २०१५ रोजीच्या सुमारास मा.सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित शेतकऱ्यांला नुकसान भरपाई तातडीने देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०७-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) याबाबतची कार्यवाही विचाराधीन आहे.

---

**सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील २८ गावांमधील जलयुक्त शिवार अभियानातील सुरु असलेल्या कामांबाबत**

**(९) ३३२२० (१३-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील २८ गावांमधील जलयुक्त शिवार अभियानातील सुरु असलेल्या कामाविषयी गावा-गावातील नागरिकांना माहिति देऊन कामाचा दर्जा वाढवावा व निकृष्ट कामे करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा अशी सूचना आढावा बैठकीत मा.लोकप्रतिनिधींनी केली असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सूचनेनुसार जलयुक्त शिवार योजनेची माहिती गावकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) जलयुक्त शिवार योजनेसंदर्भातील माहिती गावकऱ्यांना देणे करीता शिवार फेरी, जलयुक्त शिवार अभियानरथाद्वारे प्रचार व प्रसिध्दी, ग्रामसभेत कामाची माहिती, लोकप्रतिनिधी व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत कामांचा शुभारंभ आणि कामाचे वेळोवेळी फोटो काढून वेबसाईट वरुन अपलोड करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील गणेशपेठ बसस्थानकावर खासगी बस वाहतुकदार त्रास देत असल्याबाबत**

**(१०) ३६३३० (२०-०१-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील गणेशपेठ बसस्थानकावर खासगी बस वाहतुकदार त्रास देत असल्याबाबतची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या खासगी बसेसमुळे परिसरात नेहमीच वाहतुकीची कोंडी निर्माण होत असून त्याचा त्रास बसस्थानकावरील प्रवाशांना व सामान्य जनतेला सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य मार्ग परीवहन महामंडळाच्या बसस्थानकापासून २०० मीटरच्या परिघातात कुठल्याही प्रकारच्या खासगी वाहतुकीला मनाई असतांना सुध्दा खासगी बस संचालकांची कार्यालये आणि वाहनतळे आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत जनतेचा त्रासाची दखल घेऊन उच्च न्यायालयाने एका निनावी पत्राचा आधार घेत जनहित याचीका दाखल करुन घेतली असून त्यानुसार सर्व संबंधितांना न्यायालयाने नोटीस बजावली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या परिसरातील गुंडगिरी रोखण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य परिवहन महामंडळ, प्रादेशिक परिवहन आणि पोलीस विभागाची असून सुध्दा त्याकडे विशेष लक्ष देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या सदर परिसरात धुमाकुळ घालणाऱ्या व गुंडगिरी पसरविणाऱ्या खासगी बस वाहतुकदारांच्या कामाची चौकशी करुन त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-११-२०१६) :**(१) ते (४) होय.
(५) व (६) अवैध प्रवासी वाहतूकीस आळा घालण्याकरिता शासनाने दि. १४.०१.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आले. राज्य परिवहन महामंडळाद्वारा गणेशपेठ बसस्थानकाच्या परिसरातील अवैध प्रवासी वाहतूकीबाबत, दि.०९.०१.२०१६, दि.०५.०१.२०१६ व दि.२३.०१.२०१६ च्या पत्रांन्वये प्रादेशिक परिवहन अधिकारी नागपूर (ग्रामीण/शहर), पोलीस आयुक्त, नागपूर व जिल्हाधिकारी, नागपूर यांना लेखी निवेदने देण्यात आलेली आहेत. त्याप्रमाणे बसस्थानक परिसरात पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा (उत्तर) यांचेकडून वाहतूक पोलीस अधिकारी व कर्मचारी नियमित कामगिरीवर नेमूण कारवाई करण्यात येत आहे. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर/ग्रामीण) यांचेकडून अवैध वाहतूक करणाऱ्या एकूण १३२ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हयातील वणी तालुक्यात पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे व नागरिकांच्या घरांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान झाल्याबाबत

**(११) ३६८८३ (१६-०१-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील वणी तालुक्यात दिनांक १६, १७ व १८ सप्टेंबर, २०१५ रोजी मुसळधार पाऊस पडल्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे व नागरिकांच्या घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नुकसानीचे सर्वेक्षण करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, सर्वेक्षणाचे स्वरुप काय आहे व त्याअनुषंगाने संबंधीतांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०७-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३), (४) व (५) सर्वेक्षणानुसार वणी तालुक्यात २६९ घरांचे अंशत: नुकसान झाले असून, १११ गावातील शेतीपिकांचे ३३ टक्केच्या वरील १६९४.७५ हेक्टर क्षेत्रात नुकसान झाले आहे. आपदग्रस्तांना मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**कोयना प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित विकासकामांबाबत**

**(१२) ३६९२९ (१८-०१-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोयना प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित विकासकामांकरीता तसेच या पुनर्वसनग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या कामांना शासनाकडून विशेष निधी मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा व पुनर्वसन अधिकारी, सातारा यांनी दिनांक १२ जुलै, २०१३ रोजी शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा प्रस्ताव गेले अनेक दिवस शासनाकडे प्रलंबित असल्याने कोयना प्रकल्पाग्रस्तांची प्रलंबित कामे तसेच पुनर्वसनाची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोयना प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित विकासकामांकरीता तसेच या पुनर्वसनग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या कामांना विशेष निधी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.
तथापि, कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा १ व २ अंतर्गत सातारा जिल्ह्यातील प्रकल्पयंत्रणेच्या विभाजनानंतर सन २०१३-२०१४ मध्ये सातारा जिल्ह्यातील नागरी सुविधांच्या १०५ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात एकूण रु. १२.७१ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानवत शहरात (जि.परभणी) डांबरी रस्त्याची कामे निकृष्ट झाल्याबाबत**

**(१३) ३८३८० (२२-१२-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानवत शहरात (जि.परभणी) डांबरी रस्त्याची कामे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काम झाल्यानंतर लगेचच तीन महिन्यात दुरुस्ती करण्याची वेळ आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,लोकप्रतिनिधीमार्फत माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये काम निकृष्ट झाल्याबाबत संबंधीत विभागाकडे तक्रार करण्यात आली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधीतावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तिलारी प्रकल्पग्रस्तांना भरपाई देण्यासाठी प्रकल्पग्रस्तांच्या बनविलेल्या यादीतून ९४७ प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या अमान्य करण्यात आल्याबाबत**

**(१४) ४००७५ (२८-०४-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिलारी प्रकल्पग्रस्तांना भरपाई देण्यासाठी प्रकल्पग्रस्तांच्या बनविलेल्या यादीतून ९४७ प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या अमान्य करण्यात आल्याची बाब माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमान्य करण्यात आलेल्या प्रकल्पाग्रस्तांवरील अन्याय दूर करण्यासाठी व त्यांना पुन्हा यादीत समाविष्ट करून घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०७-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
जलसंपदा विभागाच्या दिनांक १७.६.२०१५ च्या शासन निर्णयानुसार ९४७ तिलारी प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून नोकरीऐवजी प्रतीकुटुंब रुपये ५ लक्ष इतके एकरकमी अनुदान मंजूर करण्यात आले असून त्यासाठी गोवा शासन ७३.३० टक्के व महाराष्ट्र शासन २६.७० टक्के निधी उपलब्ध करुन देणार आहे. एकरकमी अनुदानासाठी अर्ज मागविण्यात आले असता ९४७ तिलारी प्रकल्पग्रस्त दाखलेधारकांपैकी ७१० प्रकल्पग्रस्तांनी अर्ज सादर केले होते. त्यापैकी ४८० पात्र प्रकल्पग्रस्तांची यादी गोवा शासनाकडे बँक खात्यावर अनुदान जमा करण्यासाठी पाठविण्यात आली आहे. तसेच ९४७ पैकी २३७ प्रकल्पग्रस्तांनी अनुदान मिळण्यासाठी अर्ज अद्याप सादर केलेले नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुण्यातील शिवाजी नगर एसटी स्थानकात प्रवाशांना आणि कर्मचाऱ्यांनाही सुविधा मिळत नसल्याबाबत**

**(१५) ४०२८७ (२८-०४-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्याच्या मध्यवर्ती असलेल्या शिवाजी नगर एसटी स्थानकात अनागोंदी कारभार उघड चालू असून वेगवेगळ्या खासगी ठेकेदारांकडे सोपविलेल्या सेवांमध्ये कोणतीही सुसूत्रता नसल्याने प्रवाशांना आणि कर्मचाऱ्यांनाही सुविधाच मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानकामध्ये ये-जा करण्यासाठी प्रवेशव्दाराशिवाय इतरही ठिकाणे असल्याने सुरक्षा व्यवस्थेचा बोजवारा उडाला असून सीसीटीव्ही कॅमेरे आहेत; पण वेगळ्याच दिशेला असल्याने निरुपयोगी आहेत. कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या खोल्या अस्वच्छ, स्थानकाच्या वर्कशॉपमध्ये गुडघ्याइतके पाणी साचत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवाजीनगर एसटी स्थानकाच्या विविध व्यवस्था सुधारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१६) :**(१) व (२) नाही.

(३) पावसाळ्यात जमिनीतील पाण्याची पातळी वाढली की आगारातील मेंटनन्स पीट मध्ये पाणी येत होते. त्याबाबत दुरुस्ती केली असल्याने, सध्या पीट मध्ये पाणी येत नाही. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी व राज्य परिवहन महामंडळाच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी योग्य ठिकाणी प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने चोर, खिसेकापू, पाकिटमार यांचेपासून सावध राहण्याच्या सूचना ध्वनीक्षेपणाद्वारे केल्या जातात. तसेच तीन पाळ्यांमध्ये सुरक्षा मंडळाचे प्रत्येकी पाच प्रमाणे १५ सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली आहे. बसस्थानकात चौकशी व्यवस्था, तिकीट आरक्षण व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, लाईट, पंखे, प्रतिक्षालयातील आसनव्यवस्था, प्रसाधनगृह इ. व्यवस्था असून त्या सुस्थितीत आहेत. बसस्थानकावरील प्रसाधनगृह व बसस्थानकाची दैनंदिन स्वच्छता आगाराच्या देखरेखीखाली खाजगी संस्थेमार्फत करुन घेतली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर येथील लोकांच्या वाहनांची नोंदणी नुतणीकरण इत्यादी कामे वेळेत पूर्ण होण्याबाबत

**(१६) ४०३६३ (२८-०४-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर (जि.ठाणे) या वाढणाऱ्या शहरांबरोबर वाहनांची संख्यापण वाढत आहे, सद्या उल्हासनगर शहरात उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे एकदिवसीय शिबीर आयोजित करण्यात येते पण एवढया मोठ-मोठया भागातील लोकांच्या वाहनांची नोंदणी, नुतणीकरण इत्यादी कामे वेळेत पुर्ण होत नाहीत त्यामुळे तेथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तेथील नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधिंनी दिनांक ०८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा. मंत्री, परिवहन यांचेकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर येथील लोकांच्या वाहनांची नोंदणी, नुतणीकरण इत्यादी कामे वेळेत पूर्ण होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याणच्या अंतर्गत कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, टिटवाळा, मुरबाड तालुके समाविष्ट आहेत. यापैकी अंबरनाथ, बदलापूर व मुरबाड या कार्यालयामार्फत नागरिकांच्या सोयीकरीता दर महिन्याला एकूण प्रत्येकी तीन कॅम्प आयोजित करण्यात येतात. सदर कॅम्पमध्ये नागरिकांची जास्तीत जास्त कामे करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच खाजगी संवर्गातील वाहनांचा कर, ग्रास प्रणाली मार्फत ऑनलाईन पध्दतीने स्वीकारला जातो. खाजगी संवर्गातील वाहनांची नोंदणी सन २००७ पासून संगणकावर घेण्यात येते. तसेच राष्ट्रीय सूचना केंद्र यांनी विकसित केलेली ४.० ही संगणक प्रणाली लवकरच सुरु करण्यात येत असल्याने नागरिकांना नोंदणी प्रक्रिया सुकर व विनात्रासाची होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीवर्धन शहराच्या समुद्र किनाऱ्यालगत असलेल्या खाडीमध्ये बेकायदेशीररित्या भराव केल्यामुळे कांदळवनाची झाडे नष्ट होत असल्याबाबत**

**(१७) ४०८७० (२०-०४-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) शहराच्या समुद्र किनाऱ्यालगत असलेल्या खाडीमध्ये बेकायदेशीर रित्या भराव केल्यामुळे मोठ्याप्रमाणात कांदळवनाची झाडे नष्ट झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदळवने नष्ट होत असल्यामुळे मच्छिमारांचा पारंपारिक मच्छिमारी व्यवसाय धोक्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत बांधकामासाठी खाडी किनारी केलेल्या भरावामुळे मोठ्याप्रमाणात खाडीचे पाणी शिरल्यामुळे भातशेतीही नष्ट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०७-२०१६) :**(१) शासन राजपत्र दि.५ एप्रिल, २०१३ अन्वये श्रीवर्धन तालुक्यातील एकुण ४३२.९८०८ हेक्टर कांदळवनाखालील शासकिय क्षेत्र संरक्षित वन म्हणून अधिसूचित झाले आहे.

श्रीवर्धन (जि.रायगड) शहराच्या किनाऱ्यालगत असलेल्या खाडींमध्ये बेकायदेशीररित्या भराव केल्यामुळे मोठ्या प्रमाणात कांदळवनाची झाडे नष्ट झाल्याची बाब आढळून आलेली नाही.

श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यालगत वनखात्याच्या ताब्यामध्ये कोणतेही कांदळवन क्षेत्र नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथे कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण गृह निर्माण करण्याबाबत**

**(१८) ४०९४६ (२८-०४-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण गृह निर्माण करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण गृह निर्माण करण्यासाठी शासनाने महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांचेकडून माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास प्रस्ताव मागविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२०-०७-२०१६) :**(१), (२), (३) व (४) येवला (जि.नाशिक) येथे कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र मंजूर करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागणी केली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने तपासणी करण्याचे निर्देश महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेला देण्यात आले होते.

कृषी महाविद्यालय स्थापन करावयाच्या निकषानुसार ४० हेक्टर जमीन आवश्यक आहे. येवला येथे कृषी विभागाची ६० एकर जमीन उपलब्ध आहे. सदर जमीन निकषानुसार पुरेशी नसल्याचा अहवाल महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडून प्राप्त झाला आहे.

---

**सातारा जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार योजनेतंर्गत दुस-या टप्प्यात २१० गांवाचा समावेशामध्ये पाटण तालुक्यातील केवळ ८ गावांचा समावेश करण्यात आल्याबाबत**

**(१९) ४११६१ (२९-०४-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार योजनेतंर्गत दुस-या टप्प्यात २१० गांवाचा समावेश करण्यात आला असून डोंगरी व दुर्गम तालुका असणा-या पाटण तालुक्यातील केवळ ८ गावांचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेतंर्गत गावांच्या निवडी करताना डोंगरी भागातील डोंगरपठारावर वसलेल्या गांवाचा विचार करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डोंगरपठारावर वसलेल्या अनेक गांवामध्ये पाण्याची तीव्र टंचाई भासत असताना या गांवाना ही उन्हाळ्यात पाणी पुरवठा व्हावा याकरीता डोंगरपठारावरुन पावसाळयाचे वाहून जाणारे पाणी अडविण्याकरीता या योजनेत समावेश करावा अशी डोंगरपठारावरील जनतेकडून मोठया प्रमाणात मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक गांवाना तीव्र पाणी टंचाई जाणवत असताना सदरची गांवे या योजनेत समाविष्ट झाली नसल्याने लोकांच्यामध्ये नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, डोंगरी व दुर्गम भागातील डोंगरपठारावरील गांवे जलयुक्त शिवार योजनेतंर्गत समाविष्ट करण्याकरिता राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व अद्यापही निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत पाटण जालुक्यातील ९ गावांची निवड करण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) पाटण तालुक्यामध्ये पावसाचे सरासरी पर्जन्यमान १७३३.०० मी.मी. आहे. जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत गाव निवड निकषात येत असणाऱ्या ९ गावांचा समावेश करण्यात आला आहे. पाटण हा दुर्गम, डोंगराळ असून डोंगरपठारावरील गावे असणारा तालुका असून अशा गावांसाठी वेगळे गाव निवड निकष नाहीत.

---

**खामगांव (जि.बुलडाणा) तालुक्यातील विविध नदी व नाल्यांवर प्रस्तावित कामांना तात्काळ मंजुरी देण्याबाबत**

**(२०) ४१४८८ (२९-०४-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव तालुका अवर्षणग्रस्त असून गत ४ ते ५ वर्षापासून निसर्गाच्या अनियमिततेमुळे शेतकऱ्यांना हाती आलेले पिक गमवावे लागले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खामगांव मतदार संघातील विविध नदी व नाल्यांवर प्रस्तावित बंधारे तसेच जलयुक्त अभियान योजनेअंतर्गत प्रस्तावित कामांना तात्काळ मंजुरी देण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, मंजुरीसह त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद तात्काळ करण्यात आल्यास सदरची कामे सुरु करण्यात येवून येत्या पावसाळ्याच्या आधी कामे पूर्ण झाल्यास पुढच्यावर्षी पाण्याची समस्या निर्माण होणार नाही करिता आवश्यक निधीची तरतूद करण्यात येणार आहे काय ?

**प्रा. राम शिंदे (२२-०७-२०१६) :**(१)हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) होय.

सन २०१६-१७ मध्ये खामगाव तालुक्यातील १४ सिमेंट नाला बांधाचे नियोजन करण्यात आले आहेत. या १४ कामांना रु.३७७.२५ लक्ष निधी उपलबध करुन देण्यात येणार आहे.

नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत दि.३१ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मस नदीवरील ५ व बोर्डी नदीवरील १० अशा एकूण १५ सिमेंट नाला बांध कामांना मंजूरी देण्यात आली असून सन २०१५ व २०१६ साठी सदर कामांना रु.३००.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. उपरोक्त मंजूर कामांना प्रशासकिय मान्यता देण्यात आली असून त्यापैकी ८ कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले असून कामे प्रगतीपथावर आहेत.

---

**राज्यातील सिंचनाची तूट भरून काढण्याकरिता शासनाने सुरु केलेली जलयुक्त शिवार योजना**

**(२१) ४१५०८ (२९-०४-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सिंचनाची तूट भरून काढण्याकरिता राज्य शासनाने जलयुक्त शिवार योजना सुरू केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेवर स्वतंत्र असा निधी उपलब्ध करून न देता शासनाने विदर्भ सधन सिंचन विकास कार्यालयातून खर्च करण्याचे ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या केलेल्या कामाचे सुमारे १२ कोटी रुपयांची कंत्राटदारांची देयके थकीत असल्याने पुढील टप्प्याची कामे अद्याप सुरू केली नाही, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त संदर्भातील सद्यःस्थिती काय आहे ?

**प्रा. राम शिंदे (२२-०७-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

राज्यातील टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून जलयुक्त शिवार अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सदर अभियानाअंतर्गत टंचाईमुक्त करण्यासाठी निवड करावयाच्या गावांबाबत दुष्काळी व अवर्षणप्रवण भागाला प्राधान्य देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमासाठी फक्त विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम या एकाच योजनेअंतर्गत निधी उपलब्ध होत नसून त्यामध्ये विविध विभागांतर्गत मंजूर असलेल्या योजनांच्या निधीतून अभिसरणाद्वारे अभियान राबविले जात आहे. त्यामध्ये कृषि,

जलसंधारण, जिल्हापरिषद, पाणीपुरवठा, जलसंपदा, सामाजिक वनीकरण, वन, रोहयो इ. विभागाच्या जिल्हा वार्षिक योजना, केंद्रीय योजना व राज्यस्तर योजना आणि आमदार /खासदार निधी/ अशासकिय संस्था/ खाजगी संस्था/ खाजगी उद्योजक व लोकसहभाग याद्वारे निधी उपलब्ध होत आहे. तसेच या योजनेसाठी आतापर्यंत रु.२६०० कोटी विशेष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) बसस्थानकातील स्वच्छतेचे ठेकेदारी देऊनही बाह्य परिसराबरोबर अंतर्गत स्वच्छता करण्यात येत नसल्याबाबत**

**(२२) ४२२५० (२८-०४-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) बसस्थानकातील स्वच्छतेचे ठेकेदारी देऊनही बाह्य परिसराबरोबर अंतर्गत स्वच्छता करण्यात येत नसल्याने तसेच चोरांमुळे प्रवासी त्रस्त झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणाकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, प्रश्न भाग-१ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०७-२०१६) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) पंढरपूर बसस्थानक व वाहनतळाची दैनंदिन साफसफाई आगाराच्या देखरेखीखाली खाजगी संस्थेकडून समाधानकारक करुन घेतली जाते तसेच बसस्थानकात तीन पाळ्यांमध्ये वाहतूक नियंत्रकांना नेमणूका देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील सोयाबीनवर खोड किड व यलोमाझॅक या रोगांचा प्रादुर्भाव झाल्याबाबत**

**(२३) ४२६२६ (२८-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील सोयाबीनवर खोड किड व यलोमाझॅक या रोगांचा प्रादुर्भाव झाला असल्याने सोयबीनच्या शेंगामध्ये दाणाच भरला नसून त्यांची वाढही खुंटली असल्याने येथील शेतकरी हतबल झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नैसर्गिक बाधीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२०-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) अमरावती व नागपूर विभागातील सोयाबीन पीकासाठी पीक विमा योजना मंडळनिहाय मदत जाहिर झाल्यानंतर विमा काढलेल्या सर्व शेतकऱ्यांना पिक विमा योजनेनुसार मदत केल्याचा तसेच ज्या शेतकऱ्यांनी विमा उतरवलेला नाही, अशा शेतकऱ्यांना पिक विमा योजनेच्या मंडळनिहाय जाहिर रकमेच्या ५० टक्के रक्कम शासनमार्फत देण्याचा निर्णय राज्य शासनाने दिनांक २ मार्च २०१६ च्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलयुक्त शिवार योजनेमध्ये समाविष्ट केलेली गावे निश्चित करत असताना शासनाचे धोरण व निकषाबाबत**

**(२४) ४३१०८ (२९-०४-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने जलयुक्त शिवार योजनेमध्ये समाविष्ट केलेली गावे निश्चित करत असताना शासनाचे कोणते धोरण व निकष ठरविण्यात आलेले आहेत,
(२) असल्यास, सातारा जिल्हयातील एकूण २१५ गावांची यादी जलयुक्त शिवार योजनेकरिता माहे जानेवारी, २०१५ मध्ये घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यापैकी कोरेगांव विधानसभा मतदार संघातील अनेक गांवे ही जलयुक्त शिवार योजनेकरिता निकषामध्ये बसत असताना घेण्यात आली नाही, हे खरे आहे का,
(४) असल्यास, याबाबत तालुक्यातील जनतेनी तसेच लोकप्रतिनिधींनी शासनाकडे, त्याचप्रमाणे जिल्हाप्रशासनाकडे जलयुक्त शिवाराकरिता गावे घेण्याबाबत माहे ऑक्टोंबर २०१५ मध्ये मागणी केली आहे, हे खरे आहे काय
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०७-२०१६) :**(१) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत शासन परिपत्रक दि. २ जानेवारी, २०१५ व दि.१४ ऑगस्ट, २०१५ नुसार गावांची निवड करण्याकरिता निकष ठरविण्यात आले आहेत.
(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत दरवर्षी ५००० प्रमाणे ५ वर्षात २५००० गावे टंचाईमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यानुसार सातारा जिल्ह्यात सन २०१५-१६ करिता २१५ व सन २०१६-१७ करिता २१० गावांची निवड करण्यात आली आहे. यापुढेही जिल्ह्यातील गावे निकषानुसार निवडण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) धार्मिक स्थळ असल्याने बस स्थानकाचा परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत**

**(२५) ४३३७३ (२८-०४-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) धार्मिक स्थळ असल्याने बसने येणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असून बसस्थानकाच्या आवारात अस्वच्छता पसरल्यामुळे दुर्गंधीमुळे प्रवासी त्रस्त झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने बस स्थानकाचा परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१६) :**(१) होय.
(२) त्र्यंबकेश्वर बसस्थानकाची साफसफाई सफाईकामगारांकडून समाधानकारकरित्या होत नसल्याने त्यांना खात्यातून बडतर्फ करण्यात आले आहे व त्या ठिकाणी नवीन सफाई कामगाराची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि. रायगड) नेरळ येथील जागा एसटी आगाराकरिता देण्याबाबत**

**(२६) ४४६०८ (२८-०४-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि. रायगड) एसटी आगाराचे नेरळ येथील एसटी स्थानक हे गेली २५ वर्षे खासगी जागेत कार्यरत असून सदर जागेचे मालक गेली अनेक वर्षे गायब असल्याने त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे होत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जागा कर्जत एसटी आगाराने मिळावी याकरिता प्रयत्न सुरु केले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागा एसटी आगाराकरिता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१६) :**(१) व (२) होय.
(३) सदर जागा राज्य परिवहन महामंडळाच्या नावावर करण्याकरिता राज्य परिवहन महामंडळाव्दारा तहसिलदार, कर्जत आणि विशेष भूसंपादन अधिकारी, रायगड-अलिबाग यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर एसटी विभागात वाहक चालकांचा रिक्त जागेचा अनुशेष भरुन काढण्याबाबत**

**(२७) ४४९१२ (२८-०४-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर एसटी विभागात सध्या १५०० चालक व १४९८ वाहक कार्यरत असून चालक वाहकांच्या तब्बल ४७३ जागा रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या संबंधित विभागाने वाहक चालकांचा हा अनुशेष भरुन काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०७-२०१६) :**(१) व (२) अहमदनगर विभागात नोव्हेंबर, २०१५ मध्ये एकूण मंजूर ७२६ नियतांपैकी ६५० नियते चालविण्यात येत होती. त्याकरिता १७३८ चालक व १५३३ वाहकांची आवश्यकता होती. तथापि, अहमदनगर विभागामध्ये नोव्हेंबर, २०१५ मध्ये १४९७ चालक व १४९८ वाहक उपलब्ध होते. म्हणजेच २४५ चालक व ५५ वाहकांची कमतरता होती.

सरळसेवा भरती सन २०१५ अंतर्गत रा.प. अहमदनगर विभागात चालक (कनिष्ठ) पदातील २६२ रिक्त पदांकरिता भरती प्रक्रिया राबविण्यात येवून या भरती प्रक्रियेंतर्गत पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विटा (जि.सांगली) येथे एस.टी. आगारामध्ये एसटी खाली सापडून शाळकरी विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू**

**(२८) ४५३३७ (२८-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा (जि.सांगली) येथे एस.टी. आगारामध्ये एसटी खाली सापडून दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास एका शाळकरी विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१६)** :(१) सदरचा अपघात दिनांक ०४.०१.२०१६ रोजी घडला असून अपघातात एका शाळकरी विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे.
(२) होय.

सदर प्रकरणी चौकशी केली असता राज्य परिवहन चालकास अपघातास जबाबदार धरण्यात आले असून त्याला दि. १५.०१.२०१६ ते दि. ०६.०३.२०१६ पर्यंत निलंबित ठेवण्यात आले होते. तसेच त्यांच्यावर अंतीम कारवाईसाठी अपघात प्रकरण क्र. ०२/२०१६ अन्वये कार्यवाही सुरु आहे.
(३) सदर अपघातात मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला तात्कालीक मदत स्वरुपात रु. १०,०००/- दिनांक ०५.०१.२०१६ रोजी देण्यात आली आहे. तसेच अंतीम नुकसान भरपाई म्हणून रु. ३,००,०००/- मंजूर करण्यात आलेले आहेत. सदर अपघातात मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला देण्यात आलेली आर्थिक तात्कालीक मदत वगळून उर्वरित रक्कम रु. २,९०,०००/- मृत विद्यार्थ्यांचे वडील श्री.प्रकाश येदु मस्के यांना धनादेशाव्दारे देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा ग्रामविकासामार्फत जिल्ह्यात मंजूर करण्यात आलेल्या ८१ पाणलोट क्षेत्र प्रकल्पाबाबत

**(२९) ४६१६३ (२९-०४-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा ग्रामविकासमार्फत जिल्ह्यात ८१ पाणलोट क्षेत्र प्रकल्प मंजूर करण्यात आले, त्यासाठी २३९७.२८ लक्ष रुपयांचा निधीस मंजुरी देण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे आजही अपूर्ण अवस्थेत आहे, त्यासबंधी चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीमध्ये गैरव्यवहार करण्याच्या उद्देशाने मोठया प्रमाणात आर्थिक अनियमितता करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या गैरव्यवहारात दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२९-०७-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

बुलढाणा जिल्ह्यात एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत बॅच १ ते ६ अंतर्गत एकूण मंजूर ४२ पाणलोटांना रु.१७३०२.५९ लक्ष निधीस मंजूरी देण्यात आली आहे.

तसेच, बुलढाणा जिल्ह्यात विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत एकूण ९९ प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्याचे प्रकल्प मूल्य रु. १५६०३.८८ लक्ष इतके आहे. सदर कार्यक्रमांतर्गत सन २०१५-१६ पर्यंत रु.५६८३.३२ लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून सदर निधी पूर्णपणे खर्च करण्यात आला आहे.

(२) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत बॅच क्र. १ ते २ मधील कामे दि.३० जून, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच अपूर्ण कामेही पूर्ण करण्यासंदर्भात उप विभागीय कृषि अधिकारी व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांना सूचना दिल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्हा प्रवासी वाहतुकीचे प्रमुख केंद्र असलेल्या ठक्कर, बाजार बसस्थानकांतील समस्या सोडविण्याबाबत

**(३०) ४६६३५ (२८-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा प्रवासी वाहतुकीचे प्रमुख केंद्र असलेल्या ठक्कर, बाजार बसस्थानकांत स्वच्छतागृहांची दुर्दशा, खाजगी वाहने, भिकाऱ्यांचा उपद्रव, पोलीस यंत्रणेचे दुर्लक्ष, खाजगी दलालांकडून प्रवाशी व महामंडळाच्या कर्मचाऱ्यांवर होणारी दादागिरी या सारख्या विविध समस्यांसंदर्भात प्रवाशांनी वारंवार संबंधिताकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत बसस्थानकांतील समस्या सोडविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०७-२०१६) :**(१) व (२) बसस्थानकावरील स्वतंत्र प्रसाधनगृहाची खाजगी संस्थेमार्फत व बसस्थानक परिसराची राज्य परिवहन खात्यामार्फत दैनंदिन स्वच्छता केली जाते. तसेच बसस्थानकावर प्रत्येक पातळी चार प्रमाणे १२ मेस्कोच्या सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली असून संशयित वस्तु/व्यक्ती, मद्यपी, भिकारी, खाजगी वाहने इ. यांचेवर लक्ष ठेवले जाते. बसस्थानकात प्रवाशांसाठी सर्व मुलभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी, बुलढाणा, वाशीम, हिंगोली, लातूर, बीड, जालना, जळगाव व यवतमाळ या नऊ अल्पसंख्यांकबहुल जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रम कार्यान्वित करण्याबाबत**

**(३१) ४६७३६ (२८-०४-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील परभणी, बुलढाणा, वाशीम, हिंगोली, लातूर, बीड, जालना, जळगाव व यवतमाळ या नऊ अल्पसंख्यांक बहुल जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रम कार्यान्वित करण्याबाबतची मागणी अल्पसंख्यांक समाज धुरिणांनी, समाजसेवकांनी तसेच जनप्रतिनिधीबरोबरच अल्पसंख्यांक विध्यार्थ्यांनी मा. मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा. राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास) तसेच संबंधित जिल्ह्यांच्या/प्रादेशिक विभागांच्या संबंधित प्रशासनाधिकारी यांच्याकडे माहे डिसेंबर-२०१५ वा त्या सुमारास लेखीनिवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती महाराष्ट्रातील परभणी, बुलढाणा, वाशीम, हिंगोली, लातूर, बीड, जालना, जळगाव व यवतमाळ या नऊ अल्पसंख्यांक बहुल जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रम कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०७-२०१६) :**(१) संबंधित मान्यवरांकडून अशा आशयाचे निवेदन शासन स्तरावर प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) १२ व्या पंचवार्षिक योजनेत केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाच्या बहुक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत (MsDP) राज्यातील बुलडाणा (चिखली, शेगाव, खामगाव, बुलडाणा गट), वाशिम (मंगरुळपीर व कारंजा गट), हिंगोली (हिंगोली गट), यवतमाळ (नेर गट), परभणी (परभणी शहर), जालना (जालना शहर), लातूर (लातूर व उदगीर शहर), बीड (परळी शहर), जळगाव (चोपडा शहर), या ०९ जिल्ह्यातील ०८ गट व ०६ शहरांची नव्याने निवड केली आहे.

केंद्र शासनाकडून बहुक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत (MsDP) विहीत सुधारित मार्गदर्शक सूचनानुसार राज्यातील संबंधित ०८ गट व ०६ शहरांचे प्रकल्प अहवाल (सायबर ग्राम योजनेसह), अ.शा.पत्र दि. ७.११.२०१५ अन्वये केंद्र शासनास पाठविण्यात आले होते. यासंदर्भात केंद्र शासनाने प्रकल्प अहवालास दिलेल्या मान्यतेनुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एसटी कर्मचा-यांच्या विश्रांतीगृहांची स्थिती सुधारण्याबाबत**

**(३२) ४६९१९ (२८-०४-२०१६). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एस.टी. कर्मचाऱ्यांच्या चालक, वाहक यांच्या विश्रांतीगृहांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी कर्मचा-यांच्या विश्रांतीगृहांची स्थिती सुधारण्यात येणार असल्याचे आश्वासन मा.परिवहन मंत्री यांनी दिनांक १२ जानेवारी, २०१६ च्या सुमारास दिले होते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.परिवहन मंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार एसटी कर्मचा-यांच्या विश्रांतीगृहांची स्थिती सुधारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व आगारामध्ये / बसस्थानकात चालक / वाहक विश्रांतीगृहाची व्यवस्था करण्यात आली असून विश्रांतीगृहास आवश्यक त्या मुलभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

(२) व (३) होय.

चालक/वाहक विश्रांतीगृहाची सुधारणा करण्यासाठी तज्ञ वास्तुविशारदांची नेमणूक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निलंगा ते नांदेड मार्गे औसा-रेणापूर-लोहा ही बस सेवा सुरु करणेबाबत**

**(३३) ४७४०४ (२८-०४-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निलंगा ते नांदेड मार्गे औसा-रेणापूर-किनगाव-अहमदपूर-लोहा ही बससेवा सुरु करण्याबाबत प्रवाश्यांची मागणी असून सदर बससेवा सुरु करण्याबाबत लातूर ग्रामीण विधानसभा लोकप्रतीनिधिनी दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास आगार व्यवस्थापक, निलंगा. जि.लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बससेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१६) :**(१) होय.

(२) सदर मार्गावर निलंगा ते नांदेड मार्गे औसा-रेणापूर-किनगांव-अहमदपूर-लोहा ही बस सेवा दि.२३.०६.२०१६ पासून निलंगा आगारामार्फत सुरु करण्यात आली आहे.

निलंगा-औसा-रेणपूर-किनगाव-अहमदपूर-लोहा-नांदेड या दरम्यान थेट सेवेसाठी निलंगा-औसा-लातूर या दरम्यान ७० फेऱ्या लातूर-रेणापूर-किनगाव-अहमदपूर या दरम्यान १२ फेऱ्या व अहमदपूर-लोहा-नांदेड या दरम्यान ९० फेऱ्या दिवसभरात उपलब्ध आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील एकात्मिक पाणलोट कार्यक्रमाकरीता निर्माण करण्यात आलेली पदे रद्द करण्यात आल्याबाबत

**(३४) ४७६९८ (२९-०४-२०१६). श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एकात्मिक पाणलोट कार्यक्रमाला सुरुवात सन २००८-०९ मध्ये झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन सुचनेनुसार कृषि तज्ञ, उपजिविका तज्ञ, समूह संघटक व अन्य पदे निर्माण करुन शासन निर्णयानुसार सदर पदे रद्द करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या कर्मचाऱ्यांना सद्य:स्थिती सामावून घेण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२९-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाला सन २००९-१० मध्ये सुरुवात झाली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्ह्यातील अल्प संख्यांक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचीत असल्याबाबत

**(३५) ४७७७५ (२८-०४-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्प संख्यांक विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना सन २०१४ पासून शिष्यवृत्तीचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या मुलांमध्ये शासन मान्य मदरस्यातील मुलांचा सुद्धा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वंचित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. सन २०१४-१५ या वर्षात केंद्र पुरस्कृत योजना मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्ज ८५६९९ पैकी, ६५२०४ विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये शिष्यवृत्ती जमा करण्यात आली आहे. सदर योजना अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सन २०१४-१५ मधील शिष्यवृत्ती पात्र झालेल्या विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची अचूक माहिती प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या खात्यावर ईसीएस द्वारे शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आली आहे.

(५) खातेनंबर चूकीचा असणे, खाते बदं असणे, खाते उपलब्ध नसणे, खाते धारकांच्या नावात फरक असणे, आयएफएससी कोड सादर न करणे किंवा चुकीचा असणे इत्यादी कारणामुळे शिष्यवृत्ती वाटपात विलंब झाला.

---

**अकोला जिल्हयात होत असलेली बेकायदेशीर जंगलतोड**

**(३६) ४८५७७ (०७-०५-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पर्यावरणास बाधा पोहोचविणाऱ्या बेकायदेशीर जंगलतोड अकोला जिल्हयात मोठ्या प्रमाणात होत असल्याचे प्रकार, अवैध वाहतुकीच्या छाप्याद्वारे फेब्रुवारी महिन्याच्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) तसेच बोरमाळी (ता.बार्शी टाकळी, जि.अकोला) येथून सुमारे १४.५ वन वनौषधी असलेल्या बिहाड लाकडाचा एम.एच २८/बी ७०७२ क्रमांकाचा ट्रक जिल्हा पोलीस अधिक्षकाच्या विशेष गस्ती पथकाद्वारे मुद्देमालासह जप्त केला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीनुसार राष्ट्रीय पर्यावरणाचे संतुलन राखण्याच्या संवेदनशील बाबीवर अवैध जंगल तोडीस जबाबदार असणाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार तसेच भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी काय उपाययोजना करणार आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०७-२०१६) :**(१) अकोला जिल्हयात माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये अवैध वृक्षतोडीची २९ तर अवैध वाहतुकीची ४ प्रकरणे निदर्शनास आली आहेत.

(२) हे खरे आहे.

बार्शिटाकळी वनपरिक्षेत्रातंर्गत येत असलेल्या बोरमळी येथे पोलीसांचे विशेष गस्ती पथकाद्वारे सुमारे ९.६३७ घ.मी. जलतन स्वरुपाचे बिहाडा लाकडाचा एमएच-२८/बी-७०७२ क्रमांकाचा ट्रक मुद्देमालासह ताब्यात घेतला व पुढील कार्यवाहीसाठी वनविभागाकडे हस्तांतरीत केला आहे. चौकशीत ट्रकमधील लाकडे खाजगी शेतातील असल्याचे आढळले आहे.

(३) सदर प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) बार्शिटाकळी यांनी प्र.गु.रि.क्र.६७२/१४ दिनांक ४.२.२०१६ रोजी जारी करुन चौकशी केली असता सदर चौकशीमध्ये ही लाकडे श्री.रमेश नारायण जाधव यांचे शेत गट क्र. १५/२ मौजा चेलका येथील असल्याचे निष्पन्न झाले.

सदर लाकडाची विना परवाना वाहतूक केल्यामुळे सहायक वनसंरक्षक, अकोला यांनी भारतीय वन अधिनियम, १९२७ मधील तरतुदीनुसार प्रकरण तडजोड करुन आरोपीकडून प्रत्येकी ५००/- रुपये नुकसान भरपाईचे आदेश पारीत करुन प्रकरण निकाली काढले आहे.

वनसंरक्षण व संवर्धनाच्या विविध उपाययोजना करण्यात येतात त्यामध्ये महत्वाचे व संवेदनशील रस्त्यावर तपासणी नाके व आवश्यकतेनुसार वनसंरक्षण कुटीची उभारणी करुन वाहनांची तपासणी करण्यात येत असून वेळोवेळी नाकाबंदीची कार्यवाही करण्यात येते यांचा समावेश असून वनगुन्हा निदर्शनास आल्यानंतर त्याची दाखल घेऊन कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.

(४) कार्यवाही करण्यात आलेली असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्हयातील कडा, आष्टी व पाटोदा या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांची झालेली दुरवस्था**

**(३७) ४८६६१ (२८-०४-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील कडा, आष्टी व पाटोदा या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांची दुरवस्था झाली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बस स्थानकांच्या दुरुस्तीचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०७-२०१६) :**(१) व (२) कडा येथील बसस्थानकात उन्हाळ्यामध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने अस्वच्छता निर्माण झाली होती. तद्नंतर पाण्याची सोय करुन देण्याबाबत राज्य परिवहन महामंडळाद्वारा संबंधितांना सूचना देण्यात येत आहेत.

आष्टी येथील बसस्थानकावरील महिला प्रसाधनगृह नादुरुस्त असल्याने सदर प्रसाधनगृहाचे काम प्रस्तावित आहे. पाटोदा बसस्थानकाच्या छतातून पाण्याची गळती होत असल्याने सदर दुरुस्ती करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे. तसेच आवश्यकतेनुसार सदर बसस्थानकांची कामे राज्य परिवहन महामंडळाद्वारा वेळोवेळी केली जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परिवहन विभागाची (आर.टी.ओ) ची स्मार्ट कार्ड योजना पूर्ववत राबविण्याबाबत**

**(३८) ४८६७४ (२८-०४-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परिवहन विभागामार्फत वाहनांचे आरसी बुक स्मार्ट कार्डच्या रुपात देण्याची पध्दत सन २०१४ च्या अखेरीस संबंधित कंपनीसोबतचे कंत्राट संपल्याने बंद करण्यात आली असून पुन्हा वाहनांचे कागदी आरसी बुक वितरीत केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी प्रशासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती नव्याने निविदा काढून स्मार्ट कार्डमधील तांत्रिक चुका दुरुस्त करुन तातडीने स्पार्ट कार्ड यंत्रणा पूर्ववत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०७-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) स्मार्ट कार्ड नोंदणी प्रमाणपत्र छपाईकरिता निविदा मागविण्यात आली असून, सदर सेवा पुरवठादार निवडीची प्रक्रिया कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुरुंदवाड (जि.कोल्हापूर) या ग्रामीण भागात एस.टी. च्या सुविधा तातडीने देण्याबाबत**

**(३९) ४८६७७ (२८-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरुंदवाड (जि.कोल्हापूर) आगाराकडून योग्य नियोजन नसल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना एस.टी. सुविधा नसल्याने दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजीच्या सुमारास तालुक्यात अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांनी एस.टी. बस रोखून आंदोलन केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामीण भागात एस.टी. च्या सुविधा तातडीने देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१६) :**(१) नाही.

(२) राज्या परिवहन कुरुंदवाड आगाराच्या अखत्यारित येणाऱ्या ग्रामीण भागात राज्य परिवहन महामंडळाची सेवा सुरळीतपणे चलू आहे. तसेच सर्व गावांतील विद्यार्थ्यांच्या सोईसाठी २७५ शालेय फेऱ्या चालनात असून दरोज ६७६२ शालेय विद्यार्थी सदर फेऱ्यांच्या प्रवासी सेवेचा लाभ घेत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या कृषी विभागातर्फे पाणलोट विकासासाठी पंतप्रधान कृषी सिंचन योजने अंतर्गत आराखड्यांस मान्यता देण्याबाबत**

**(४०) ४९०८७ (२८-०४-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कृषी विभागातर्फे पाणलोट विकासासाठी पंतप्रधान कृषी सिंचन योजने अंतर्गत सन २०१५-१६ या वर्षाकरिता १ हजार ८० कोटी रुपयांचा आराखड्यांस मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००९-१० ते २०१४-१५ साठी ११८६ पाणलोट प्रकल्पांना या पूर्वीही शासनाने मंजूरी दिली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यापैकी किती पाणलोट प्रकल्पाअंतर्गत किती हेक्टर क्षेत्राला सिंचन उपलब्ध झाले आहे,

(४) असल्यास, सन २००९ ते २०१५ या वर्षातील सिंचन जलसिंचन धोरणांची चौकशी शासनाने केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती जलसिंचन धोरणांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२९-०७-२०१६) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) मार्च, २०१६ पर्यंत एकूण ९३२ पाणलोट प्रकल्पांतर्गत नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन (NRM) या घटकांची कामे सुरु असून त्याचा प्रमुख उद्देश भूजलाचे पुनर्भरण हा आहे. यामधून अप्रत्यक्षरित्या संरक्षित सुमारे ९४ हजार हेक्टर क्षेत्राला सिंचन उपलब्ध झाले आहे.

(४) होय.

(५) राज्य जलनीती, २०१४ च्या मसुद्यावर जलसंधारण, पाणी पुरवठा व स्वच्छता, उर्जा, पर्यावरण, उद्योग, कृषि विभाग व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी दिलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाने सुधारीत महाराष्ट्र राज्य जलनीती २०१६ चा मसुदा तयार केला असून दिनांक २७/४/२०१६ रोजी शासनास सादर केला आहे. सदर मसुदा अंतिम करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र पाणलोट व्यवस्थापन समित्यांबाबत**

**(४१) ४९१५६ (२९-०४-२०१६). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र पाणलोट व्यवस्थापन समित्या स्थापन केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समित्यांच्या अंतर्गत ग्रामस्थेच्या माध्यमातून सचिवाद्वारा शेती सिंचनासाठी पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू व्यवस्थापन समित्यांच्या सचिवांना अल्प मानधन देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, देण्यात येणाऱ्या नाममात्र मानधनात वाढ करुन सचिवांना प्रशिक्षण व अन्य सुविधा देण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हेही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२९-०७-२०१६) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) नाही. सामाईक मार्गदर्शक सूचना-२००८ सुधारित २०११ मुददा क्र.६.४ (४६) अन्वये पाणलोट समितीच्या सहाय्याखेरीज अन्य कोणत्याही जबाबदाऱ्या पाणलोट समिती सचिवांकडे नाहीत.

(३) व (४) पाणलोट समिती सचिव, सेवाभावी पदाधिकारी असून त्यासाठी पाणलोट समिती सचिवांना दरमहा रु.३०००/- इतके मानधन व रु.५००/- प्रवास भत्ता देण्यात येत आहे. पाणलोट समिती सचिवांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमडापूर (ता.चिखली, जि.बुलढाणा) एसटी स्थानकाची दुरवस्था सुधारण्याबाबत**

**(४२) ४९३१९ (२८-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमडापूर (ता.चिखली, जि.बुलढाणा) हे गाव सर्वात मोठे असून नागपूर पुणे राज्य महामार्गाला लागून असल्याने त्यामुळे या गावावरुन जवळपास ५० ते ५५ खेडयातील गावकरी प्रवास करीत असताना या ठिकाणी २ एकर जागेत असलेले एसटी स्थानकाची दुरवस्था झाली असतानाही स्थानिक परिवहन विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमडापूर एसटी स्थानकाची दुरवस्था सुधारण्यासाठी शासनाकडून कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०७-२०१६) :**(१) नाही.
(२) अमडापूर येथील बसस्थानकाचे आधुनिकीकरण व दर्जावाढ करणेच्या रु.५०.०० लाख रक्कमेच्या कामासाठी शासनाच्या सन २०१५-१६ सर्वसाधारण योजनेतून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जलपुर्ती सिंचन विहीरीच्या योजनेला महात्मा गांधी रोजगार सिंचन योजनेप्रमाणे अनुदान मिळण्याबाबत**

**(४३) ४९३२५ (२८-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाला जलपुर्ती सिंचन योजनेच्या विहीरीचे अनुदान २ लक्ष ५० हजार असुन महात्मा गांधी रोजगार सिंचन योजनेच्या विहिरीच्या अनुदान २ लक्ष ९० हजार आहे परंतु मागासवर्गीय शेतकऱ्यांसाठी विशेष घटक योजनेच्या विहीरीचे अनुदान फक्त १ लक्ष रुपये आहे अशी तफावत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने निर्णय घेवुन विशेष सिंचन घटक योजनेअंतर्गत विहीरीच्या अनुदानात महात्मा गांधी रोजगार सिंचन योजने एवढे २ लक्ष ९० हजार अनुदान मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२०-०७-२०१६) :**(१) अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनेमध्ये विहिरींसाठी रु.१.०० लाख एवढे अनुदान अनुज्ञेय आहे.
(२) अनुसूचित जाती नवबौध्द शेतकऱ्यांसाठी विहिरीचे अनुदान रु.२.०० लाख करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पवनी (जि.भंडारा) येथे बसेसची संख्या वाढविण्याबाबत तसेच अनियमितता वेळापत्रकामध्ये सुधारणा करण्याबाबत**

**(४४) ४९४१० (२८-०४-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवनी (जि.भंडारा) येथील शाळकरी व महाविद्यालयातील तसेच नजीकच्या गावाहून येणारे विद्यार्थी/विद्यार्थीनी शहरात शिक्षणासाठी येतात परंतु बसेसची अत्यल्प संख्या व अनियमित वेळापत्रकामुळे विद्यार्थ्यांना यांचा त्रास होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पवनी (जि.भंडारा) येथे बसेसची संख्या वाढविण्याबाबत तसेच अनियमित वेळापत्रकामध्ये सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) पवनी येथील शाळकरी व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी पवनी आगारांतर्गत विविध मार्गाद्वारे ३३ नियते उपलब्ध आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथे गॅस्ट्रोच्या साथीने ग्रामस्थ त्रस्त झाल्याबाबत**

**(४५) ४९८०७ (११-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथे गॅस्ट्रोच्या साथीने शेकडो ग्रामस्थांना त्रस्त केले असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर साथीला आळा घालण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०७-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

संगमनेर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र निमगांव जाळी अंतर्गत उपकेंद्र आर्वी बु. लोकसंख्या ५५१६ पासून या ठिकाणी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये दि.१०/१२/२०१५ ते दि.१७/१२/२०१५ अखेर आश्वी बु. येथील संशयीत अतिसार रुग्ण २७६ आढळून आले होते. साथ सुरु झाल्याबरोबर तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांच्या साथ नियंत्रण पथकाने पुरेसा औषधसाठा व कर्मचारी यांचेसह तात्काळ भेट देऊन जलद साथ सर्व्हेक्षण केले. पाणी पुरवठा योजनेतील नळगळती शोधून ग्रामपंचायतीमार्फत दुरुस्ती करण्यात आली. पाण्याची शास्त्रोक्त पध्दतीने निर्जंतुकीकरण करुन, O.T. परिक्षण करुन पाणी पुरवठा करण्यात आला. गावात आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत रुग्ण शोध मोहिम राबविण्यात येऊन तात्काळ औषधोपचार करण्यात आला. साथीच्या काळात जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा साथरोग पथक, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी दि.११/१२/२०१५ रोजी समक्ष भेट देऊन साथ नियंत्रण पथक विविक्षित कक्ष २४ तास कार्यरत ठेवणेत आले. संशयीत रुग्णांना तात्काळ औषधोपचार करुन घरी सोडण्यात आले. गावात आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत साथरोग प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत जनजागृती आरोग्य शिक्षण देण्यात आले. तसेच घरोघर मदर सोल्युशन वाटण्यात आले.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्ह्यातील लांडोरखोरी येथे वन उद्यान विभाग उभारण्याबाबत**

**(४६) ५१४१० (०७-०५-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील लांडोरखोरी येथे वन उद्यान विभाग उभारण्याबाबत स्थानिक जनतेकडून सातत्याने मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने मा.वनेमंत्री, यांच्याकडे दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०७-२०१६) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) जळगांव जिल्ह्यातील मौजे लांडोरखोरी जिल्हा जळगाव येथे उपवनसंरक्षक, जळगांव यांचेमार्फत सन २०१५-१६ मध्ये वन उद्यान सुरु करण्यात आलेले आहे. त्यासाठी एकूण रुपये ५९.०२ लाख खर्च करण्यात आलेला आहे. तसेच सन २०१६-१७ मध्ये ४६.११ लाखांची कामे प्रस्तावित आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील घोट वन परिक्षेत्रातील वन जमिन वनविकास महामंडळास देण्यास स्थानिकांचा विरोध असल्याबाबत**

**(४७) ५१९१६ (०७-०५-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील घोट वन परिक्षेत्रातील वन जमिन एफ.डी.सी.एम. ला मोठ्या प्रमाणावर हस्तांतरण करून दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जंगलातून मोठ्या प्रमाणावर गौण वनोपज प्राप्त होत असल्याने त्यातून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होत आहे , हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रोजगार व उत्पन्न वाढीसाठी गडचिरोली जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांसाठी असलेली जमीन १९८० चा वन कायदा दाखवून, जंगलाचा नाश होऊ नये म्हणून सिंचन प्रकल्पांना नाकारण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय ,

(४) याउलट मात्र एफ.डी.सी.एम ला जंगल तोडून वन जमीन उपलब्ध करून दिली जाते, हे खरे आहे काय

(५) तसेच उक्त जमीनीच्या हस्तांतरणाला स्थानिकांचा मोठा विरोध असून जमीन हस्तांतरण रद्द व्हावे अशी स्थानिकांची मागणी आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०७-२०१६) :**(१) एफ.डी.सी.एम.लि. दक्षिण चंद्रपूर प्रदेशाअंतर्गत मार्कंडा वन प्रकल्प विभागाला घोट वन परिक्षेत्रातील ५६७०.९९८ हे. वनक्षेत्र हस्तांतरीत करण्यात आले आहे.

(२) एफ.डी.सी.एम.लि. कडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या क्षेत्रातूनही आजही गौण वनोपज प्राप्त होत असून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होत आहे.

(३) वन क्षेत्रात वनेतर कामे करावयाची झाल्यास त्यास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतूदी आकृष्ट होतात. प्रकल्प यंत्रणेकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर केंद्र शासनाकडे पूर्व परवानगीस्तव पाठविण्यात येतात. तथापि केंद्र शासनाने गडचिरोली जिल्हयातील खालील प्रकल्पांची परवानगी देण्यास असमर्थता दर्शविली आहे.

| प्रकल्पांचे नावे | बाधित वनक्षेत्र (हे) |
|---|---|
| जांभुळखेडा, सिंचन तलाव | ४४.२०० |
| सोनेरांगी, सिंचन तलाव | ३१.२०० |
| तुलतुली, सिंचन तलाव | २२२८.०६० |
| कारवाफा, सिंचन तलाव | ५६९.७२० |
| राममोहनपूर, सिंचन तलाव | २१.०८३ |

(४) एफ.डी.सी.एम.ला हस्तांतरीत केलेले वन क्षेत्र आहे त्या स्वरुपात हस्तांतरीत करण्यात येते. वनक्षेत्र हस्तांतरीत करण्यापूर्वी जंगल तोडले जात नाही.

(५) सदरहू वन जमीन हस्तांतरणाला मोजक्या लोकांचा गैरसमजातून विरोध होत आहे. स्थानिक गावकऱ्यांना एफ.डी.सी.एम.लि. चे अधिकारी व कर्मचारी यांच्याद्वारे एफ.डी.सी.एम.लि. च्या कार्यप्रणालीबद्दल समजावून गैरसमज दूर करण्यात येत आहे.

(६) वन जमिनीची उत्पदकता वाढविण्याच्या दृष्टिने उच्चप्रजातीचे रोपवन करण्यासाठी वनक्षेत्र एफ.डी.सी.एम.लि. ला वेळोवेळी हस्तांतरीत करण्यात येते.

---

## कोल्हापूर जिल्हयामध्ये प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून वाहनधारकांना रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळत नसलेबाबत

**(४८) ५३२०३ (२८-०४-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामध्ये नवीन व जुन्या वाहनधारकांना आपल्या वाहनाचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळत नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती कोल्हापूर जिल्हयामध्ये नवीन व जुन्या वाहनधारकांना आपल्या वाहनाचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०७-२०१६) :**(१) व (२) स्मार्ट कार्ड नोंदणी प्रमाणपत्र पुरविणाऱ्या सेवा पुरवठादाराबरोबरचा करार संपुष्टात आल्यामुळे वाहन नोंदणी प्रमाणपत्राचा तुटवडा निर्माण झाला होता, हे खरे आहे.
(३) नोंदणी प्रमाणपत्राचा कोल्हापूर जिल्ह्यात तुटवडा असल्यामुळे परिवहन आयुक्त कार्यालयाने दिनांक १८.०३.२०१६ रोजी नोंदणी प्रमाणपत्रे कार्यालयाअंतर्गत छपाई करुन वितरीत करणेची प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर यांना परवानगी दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नायगांव (जि.नांदेड) येथे मागील ५ वर्षापासून होत असलेली बसस्थानकाचे मागणीबाबत**

**(४९) ५३२२० (२८-०४-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगांव (जि.नांदेड) येथे मागील ५ वर्षापासून होत असलेली बसस्थानकाची मागणी लक्षात घेता व वारंवार शासनाकडे पाठ पुरावा करुन देखिल बसस्थानक बांधकामास शासनाकडून मंजूरी देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल विभागाच्या मुख्य रस्त्यालगत असलेल्या जागेसंबंधी शासनाकडे मागणी करुन सुध्दा अदयाप त्यास मान्यता मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यावर नायगांव (जि.नांदेड) येथे बसस्थानक बांधकामास मंजूरी देण्याबाबत तसेच महसूल विभागाच्या मुख्य रस्त्यालगत असलेल्या जागेसंबंधी मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०७-२०१६) :**(१), (२) व (३) नायगांव येथील बसस्थानकाच्या भूखंडाचे क्षेत्रफळ ०.४० हेक्टर असून हा भूखंड राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१ लगत आहे. हा भाग अनागरी भागामध्ये समाविष्ट असून रस्ते प्राधिकरणाच्या नियमानुसार नियंत्रण रेषेपासून ७५ मीटर (२४६ फूट) अंतरावर बसस्थानक बांधकाम अनुज्ञेय असल्यामुळे बसस्थानक बांधण्याइतपत पुरेसे क्षेत्रफळ उपलब्ध नाही.

नायगांव येथे बसस्थानक बांधकाम मंजुरी देण्याबाबत तसेच महसूल विभागाच्या मुख्य रस्त्यालगत असलेली जागा उपलब्ध करुन घेण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील (ता.धर्माबाद) येथील मध्यवर्ती बसस्थानकाचे काम सुरु करणेबाबत**

**(५०) ५३२२१ (२८-०४-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील (ता.धर्माबाद) येथील मध्यवर्ती बसस्थानकासाठी निधीची तरतुद होऊनसुध्दा अदयापपर्यंत काम सुरु झाले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती नांदेड जिल्हयातील (ता.धर्माबाद) येथील मध्यवर्ती बसस्थानकासाठी काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१६) :**(१), (२) व (३) नांदेड जिल्हयातील धर्माबाद येथील बसस्थानकाचे आधुनिकीरकण, दर्जावाढ व पुनर्बांधणी कामासाठी तज्ञ वास्तुविशारदांकडून नकाशे व अंदाजपत्रके तयार करुन घेण्याची कार्यवाही राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.